GOVERNMENT OF MAHARASHTRA

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे

यांचे कार्यालय, नविन मध्यवर्ती इमारत, १ ए.बी.रोड, पुणे-४११००१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२८४६/४७ Email- comm.housing20@gmail.com

जा.क्र.गृह/डी-३/सह.गृह.संस्था/नोंदणी प्रक्रिया/२०२६/१६८७ दि. १२ ~~सप्टेंबर~~ ऑक्टोबर,२०२६

*** परिपत्रक ***

विषय:- सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या विकासक / प्रवर्तक असहकार्याच्या नोंदणी प्रक्रियेबाबत.

सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान संख्येइतक्या (५१%) व्यक्तींनी फ्लॅट्स (अपार्टमेंट्स) घेतल्यावर महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांचे विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम (मोफा), १९६३ चे कलम १० (१) व त्या खालील नियम, १९६४ चा नियम ८ मध्ये असलेल्या तरतुदी प्रमाणे ठरवून दिलेल्या ०४ महिन्याच्या कालावधीच्या आंत सहकारी संस्था अथवा वेश्मधारकांचा संघ स्थापन करण्यासाठी विकासकाने / प्रवर्तकाने नोंदणी अर्ज केला नसल्यास, मोफा कायद्यातील कलम १० (१) नुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८ व त्याखालील नियम ४ अन्वये ठरवून दिलेल्या नमुना 'अ' मध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह संस्थेतील किमान ५१% सदस्य नियोजित संस्थेचा नोंदणी प्रस्ताव सक्षम प्राधिकारी तथा संबंधित जिल्हा उपनिबंधक यांचेकडे दाखल करू शकतात.

संबंधित जिल्हा उपनिबंधक यांचेकडून अर्जदार आणि विनंतीच्या सत्यतेची पडताळणी करून तसेच संबंधित विकासक / प्रवर्तकाला म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन संस्थेच्या सदस्यांनी दाखल केलेला अर्ज योग्य असल्याची खात्री पटल्यावर सक्षम प्राधिकारी तथा संबंधित जिल्हा उपनिबंधक, मोफा कायद्यातील कलम १० (१) नुसार सदर संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणी करण्याचे आदेश पारित करतात. असे आदेश पारित केल्यानंतरच संबंधित नियोजित संस्थेचे नाव आरक्षित करण्याची व बँक खाते उघडण्याची परवानगी देणेबाबत कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. परंतू काही विभागात सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांनी कलम १०(१) नुसार संस्था नोंदणीचा आदेश पारित करण्यापुर्वीच संबंधित निबंधक यांनी संस्थेस नाव राखून बँकेत खाते उघडण्याची परवानगी देतात असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित निबंधक यांना विहित कालावधीत (दोन महिन्यामध्ये) नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होत नाही.

सबब सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या विकासक / प्रवर्तक असहकार्याच्या नोंदणी प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत –

"विकासक / प्रवर्तक असहकार्याचा" नोंदणी प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांचेकडून मोफा कायद्यातील कलम १० (१) अन्वये आदेश प्राप्त झाल्यानंतरच संस्थेचे नाव आरक्षित करणे व बँक खाते उघडण्यास परवानगी देण्याची पुढील कार्यवाही संबंधित निबंधक यांनी अंतिम करावी. सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांचेकडून मोफा कायद्यातील कलम १० (१) अन्वये आदेश प्राप्त होण्यापुर्वी नाव आरक्षित करण्यास व बँक खाते उघडण्यास परवानगी देऊ नये.

(दिपक तावरे भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत उचित अंमलबजावणीस्तव :-

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. सहनिबंधक/ उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (एसआरए/ सिडको/ म्हाडा/ एमएमआरडीए)
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीसाठी :- मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

(**टिप-** सदर परिपत्रक सहकार आयुक्त व निबंधक, स.सं., म.रा., पुणे यांच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)